झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स-II, सेनापती बापट रोड, पुणे -१६
जा.क्र.झोपुप्रा/सप्रा-२/१६५१ /२०२४
दिनांक :-११/१० /२०२४

"झोपडपट्टी पुनर्वसन आदेश (अंतिम)"

महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३क अन्वये अंतिम आदेश

**प्रस्तावना-**

स.नं.१६अ/१अ/४, सि.स.नं.३४९१ ते ३४९७, भोईटे वस्ती, बोपोडी, पुणे येथील अनुसूचीत नमूद केलेल्या क्षेत्रासंदर्भात महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ च्या कलम ३(क) अंतर्गत खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारित करण्यात येत आहे.

(१) ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३(क) मध्ये नमूद तरतुदीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा, पुणे हे सक्षम आहेत ; आणि

(२) ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याची दि.०६/०३/२०२४ रोजीची पूर्वसूचना प्रकरणातील सविस्तर पार्श्वभूमी नमूद करुन महाराष्ट्र शासन राजपत्र मार्च, १४-२०, २०२४ मध्ये पृष्ठ क्र.१३ व १४ वर तसेच दैनिक वृत्तपत्रात दि.०८/०३/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच, सदरची पूर्वसूचना सर्वसाधारणपणे सर्वांना ठळकपणे दिसून येईल अशा प्रत्यक्ष जागेवर दि.०८/०३/२०२४ रोजी डकवून प्रसिध्द करण्यात आली आहे ; आणि

(३) ज्याअर्थी, विषयांकित मिळकतीवर वाल्मिकी आंबेडकर आवास योजनेअंतर्गत अनुदान घेतलेल्या लाभार्थ्यांचे संदर्भात ११३१.४४ चौ.मी. क्षेत्र असल्याचे उप अधीक्षक, भूमी अभिलेख यांनी त्यांच्या पत्र क्र.जा.क्र.झोपुप्रा/भूमीअभिलेख/२७२०/२०२४ दि.२७/०९/२०२४ नुसार स्पष्ट केले आहे. त्यामुळे अधिनियमातील कलम ३(क) अंतर्गत झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषीत करण्याची पूर्वसूचना जारी करतेवेळी ग्राहय धरण्यात आलेले पुनर्वसन क्षेत्र ४७३७.२० चौ.मी. यामधून WAMBY अंतर्गत अनुदान प्राप्त झालेल्या व योजनेमध्ये सहभागी होण्यास उत्सुक नसणाऱ्या लाभार्थ्यांशी संबंधित ११३१.४४ चौ.मी. क्षेत्र वगळता उर्वरित ३६०५.७६ चौ.मी. इतके क्षेत्र "झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र" म्हणून निर्धारित करणे योग्य होत आहे; आणि

(४) ज्याअर्थी, वाल्मिकी आंबेडकर आवास योजनेअंतर्गत अनुदान घेतलेल्या लाभार्थ्यांचे बाबतीत गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडून मार्गदर्शन मिळणेबाबतचे विनंती पत्र या कार्यालयाकडून दि.२६/०९/२०२४ रोजी सादर करण्यात आले आहे. योजनेअंतर्गत अनुदान प्राप्त केलेले ९ लाभार्थी यांनी त्यांचे अनुदान शासनास परत करण्याची व योजनेस सहभागीची तयारी दर्शविली आहे व त्या अनुषंगाने संबंधित क्षेत्राबाबत अलहिदा निर्णय घेणे योग्य होणार आहे; आणि

(५) ज्याअर्थी, सदर पूर्वसूचनेची प्रत जागा मालक यांना व एक प्रत माहितीस्तव मा. आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे यांना देण्यात आली आहे आणि पूर्वसूचनेद्वारे जागा मालक किंवा इतर यांना त्यांच्या ज्या काही सूचना/हरकती असतील त्या ३० दिवसांचे आत या कार्यालयाकडे सादर करणेबाबत फर्माविण्यात आले असता सदर कालावधी पूर्ण झाल्यानंतर या कार्यालयाकडे जमीन मालक अथवा इतर कोणाचीही लेखी स्वरुपात हरकत/तक्रार प्राप्त झालेली नाही.

त्याअर्थी, उपरोक्त परिस्थितीचे अवलोकन करता महाराष्ट्र झोपडपट्टीच्या कलम ३(क) मधील तरतुदीनुसार खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारित करण्यात येत आहे.

आदेश :-

(१) सदर झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करण्या संदर्भातील दि.०६/०३/२०२४ रोजीची जाहीर नोटीस (झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषीत करण्याची पूर्वसूचना) मधील क्षेत्रात सुधारणा करून खालील अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र या आदेशाद्वारे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून अंतिमत: आदेशित करण्यात येत आहे.

(२) सदरच्या आदेशाविरोधात उक्त अधिनियमाच्या कलम ३(क) मधील तरतुदीनुसार प्रस्तुत आदेश प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांचे आत मा. शिखर तक्रार निवारण समिती, वांद्रे, मुंबई येथे अपील दाखल करणे शक्य आहे.

अनुसूची I - कलम ३(क) अंतर्गत घोषीत अंतिम क्षेत्र

झोपडपट्टीचे नाव :- सि.स.नं.३४९१ ते ३४९७, स.नं.१६अ/१अ/४, भोईटे वस्ती, बोपोडी, पुणे

महानगरपालिका क्षेत्र :- पुणे महानगरपालिका.

| गाव- बोपोडी, पुणे | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| स.नं./ सि.स.नं. / फा.प्लॉ.क्र | जमीन/ भोगवट दाराचे हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | कलम ३(क) पूर्वसूचने मधील नमूद क्षेत्र (चौ. मी.) | अधिसूचनेतून वगळण्यात येत असलेले क्षेत्र | अधिसुचित क्षेत्र (चौ. मी.) | योजनाक्षेत्राची चतु:सिमा | | | |
| | | | | | पुर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| सि.स.नं.३४९१ ते ३४९७, स.नं.१६अ/१अ/४ | खाजगी | ४७३७.२० चौ.मी. | ११३१.४४ चौ.मी. | ३६०५.७६ चौ.मी. | लागू सि.स.नं ३४९९ | लागू सि.स.नं. ३४९० | लागू सि.स.नं. ३४९१ पैकी | संरक्षण विभाग रेल्वे लाईन |

अनुसूची II - WAMBY अंतर्गत लाभ घेतलेल्या व योजनेत सहभागी होण्यास ईच्छुक नसलेल्या लाभार्थ्यांशी संबंधित प्राथमिक ३क आदेशात समाविष्ट असलेले, मात्र अंतिम ३क आदेशात वगळलेल्या क्षेत्राची चतुःसीमा

| अधिसूचनेतून वगळलेल्या जमिनीचा भाग | अधिसूचनेतून वगळलेले (क्षेत्र चौ.मी.) | पुर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
|---|---|---|---|---|---|
| | १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | १८८.६३ चौ.मी. | लागू सि.स.नं.३४९९ | लागू सि.स.नं.३४९१ पैकी | लागू सि.स.नं.३४९१ पैकी | लागू सि.स.नं. ३४९१ पैकी |
| २ | ९४२.८१ चौ.मी. | लागू सि.स.नं.३४९१ पैकी | लागू सि.स.नं.३४९० | लागू सि.स.नं.३२२२ | संरक्षण विभाग रेल्वे लाईन |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह पारित करण्यात येत आहे.

दिनांक :- ११ / १० /२०२४

(झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण स्थापना ३०/६/२००५ पुणे)

(नीलेश र. गटणे) (भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

प्रत-

१. मा.आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना माहितीस्तव सादर.
२. मे.मानव रिँब एल.एल.पी. तर्फे संचालक प्रमोद मोहनलाल बाफना - ऑफीस नं.४०१ ते ४०५, रविराज सीआरयु मॉल, गंगाधाम रोड, पुणे ४११०३७ - यांना माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव.